महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणूक करणे...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्र.:-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक :- ०९/०२/२०१५

**वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का.५, दि.२१/११/२०११**

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. २१/११/२०११ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी साधारणत: ४ ते ६ प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील असे आदेशित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी काढलेल्या अध्यादेशान्वये (सन २०१४ चा १८) महानगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांकरिता बहुसदस्यीय प्रभाग पध्दती रद्द करुन एकसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने एकसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केल्यामुळे उपरोक्त दि. २१/११/२०११ चे आदेश रद्द करुन सुधारित आदेश निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दि.२१/११/२०११ चे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

२) राज्यातील महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रत्येकी १० ते १२ प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये साधारणत: १० प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
५. मा.राज्य निवडणूक आयुक्तांचे स्वीय सहायक
६. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७. निवड नस्ती

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५.docx